मंत्रालय उपाहारगृह योजना.....
अस्थायी पदाना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग (उपाहारगृहे)
शासन निर्णय क्रमांक : आस्था-२०१९/प्र.क्र.५६/(१)मंउका,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : १९ मार्च, २०१९.

वाचा : १) शासन निर्णय, सा.प्र.वि. (उपाहारगृहे), क्रमांक:-आस्था-२०१८/प्र.क्र.१०६/(१)मंउका, दि.०६.१०.२०१८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनी-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०१९.

शासन निर्णय

संदर्भाधिन दि.०६.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील २७ अस्थायी पदे दि.२८.०२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती. आता वित्त विभागाच्या दि.२१.०२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार सदरहू २७ अस्थायी पदे दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	पदांची संख्या	वेतनश्रेणी
१.	२.	३.	४.
गट-ब (राजपत्रित) मधील पद			
१.	सहाय्यक लेखा अधिकारी	१	९३००-३४८०० ग्रे. वे.४४००
	एकूण	१	
गट-क मधील पद			
२.	बिल लेखापाल	१	५२००-२०२०० ग्रे.वे. १९००
	एकूण	१	
गट-ड मधील पद			
१.	कुपन विक्रेता	१	५२००-२०२०० ग्रे.वे . २०००
२.	आचारी	१	४४४०-७४४० ग्रे.वे. १७००
३.	चहा विशेषज्ञ	१	४४४०-७४४० ग्रे.वे . १७००
४.	सहाय्यक आचारी	१	४४४०-७४४० ग्रे.वे . १४००
५.	चहा बनविणार	१	४४४०-७४४० ग्रे.वे . १४००
६.	वेटर	१०	४४४०-७४४० ग्रे.वे . १४००
७.	बॉयवेटर	१०	४४४०-७४४० ग्रे.वे . १४००
	एकूण	**२५**	
एकूण [ब(राजपत्रित)क+ड]		**२७**	

२. वरील पदांचा वेतन व भत्ते यावरील खर्च " मागणी क्रमांक :अ-४/साप्रवि/२०७५-संकीर्ण सर्वसाधारण सेवा-(१०८)-उपाहार भांडार विभाग-(००) (०१)-मंत्रालय उपाहारगृह योजना (२०७५०१३१) ०१- वेतन व भत्ते" या शिर्षाखालील सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनी-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक **२०१९०३१९१७३६५१४६०७** असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Imtiyaz
Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, serialNumber=77a529748c5e7c1ba7a66e81c654ba3c492fda5b29e076241db1ba213ddedf4e, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2019.03.19 17:39:26 +05'30'

(इ. मु. काझी)
सह सचिव (उपाहारगृहे)
महाराष्ट्र शासन.

प्रति

अधिदान व लेखा अधिकारी, मंबई.

प्रत:-

१) महालेखापाल - १, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
२)महालेखापाल - १, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
४) वित्त विभाग, व्यय-४/, अर्थसं-१९, मंत्रालय, मुंबई,
५) देयक लेखापाल, मंत्रालय उपाहारगृह, मंत्रालय ,
६) निवड नस्ती.